

सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर

सलगर वस्ती, फ्री सेटलमेंट कॉलनीत आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मिळकत कर सदर्भात केली पाहणी थकबाकीदारांवर कारवाईचे दिले आदेश...

Volume III Issue 50 Date 16-06-2025

सलगर वस्ती, फ्री सेटलमेंट कॉलनीत आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मिळकत कर सदर्भात केली पाहणी थकबाकीदारांवर कारवाईचे दिले आदेश...

मिळकत कर भरण्यास नागरिकांनी सहकार्य करावे – आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे आवाहन

सोलापूर --सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज सोलापूर शहरातील सलगर वस्ती, फ्री सेटलमेंट कॉलनी या भागात भेट भेट देऊन मिळकत कराच्या सदर्भात तपासणी केली. यावेळी त्यांनी परिसरातील नागरिक व व्यावसायिक मिळकतधारकांची थेट भेट घेऊन मिळकत कर भरण्याचे आवाहन केले.

तपासणी दरम्यान आयुक्तांना असे आढळून आले की, अनेक मिळकतधारकांनी कर भरणे टाळले असून महापालिकेचे महसूल थकवले आहेत. त्यामुळे अशा नागरिकांना आणि आस्थापनांना तात्काळ नोटीस बजावून मिळकत कर भरण्यास निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले.

याचबरोबर, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अशा खाजगी आस्थापना, शाळा, दुकान, मेडिकल,दवाखाने याची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत, ज्या ठिकाणी अधिकृत मंजुरीशिवाय वाढीव बांधकाम करण्यात आले आहे. अशा वाढीव बांधकामांवर कायदेशीर कार्यवाही करत त्यांना वाढीव मिळकत कर लावण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

त्याचप्रमाणे, ज्या खाजगी आस्थापनांनी, दुकान यांना अनेक वेळा सूचना मिळाल्यानंतरही मिळकत कर भरलेला नाही, अशा आस्थापनांची नोंद घेऊन त्यांना अंतिम नोटीस पाठवून, ठराविक मुदतीत कर न भरल्यास संबंधित आस्थापनां सील करण्याची कारवाई हाती घेण्याच्या स्पष्ट सूचना देखील त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

महसूल वसुली वाढविण्यासाठी व नागरी सुविधा सुरळीतपणे पुरविण्यासाठी महापालिकेने मिळकत कर वसुलीला गती दिली असून नागरिकांनी वेळेवर कर भरून जबाबदार नागरिकत्वाचे पालन करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यावेळी केले. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे यांच्यासह मालमत्ता विभागातील अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

